जळगाव तरुण भारत
Main Edition | 2022-08-08 | Page- 3
epaper.tarunbharatjalgaon.com

# इंडिया आशा फाउंडेशनचा 'हर घर तिरंगा' अभियानात सहभाग

## १० दशलक्ष नागरिकांच्या प्रतिसादाचे ध्येय

**जळगाव/धुळे** : भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्यात येत आहे. इंडिया आशा फाउंडेशनतर्फे या अभियानात वेगळ्याप्रकारे सहभागी होण्यासाठी एक देशभक्तीपर गीत तयार करण्यात आले आहे - मी एक निनावी मावळा . १३ रोजी हे गीत प्रसारित करण्यात येणार आहे. हर घर तिरंगा अभियानांतर्गत एक आठवड्यात दहा दशलक्ष नागरिकांनी हे गीत ऐकावे,पहावे असे उद्दिष्ट संस्थेने डोळ्यासमोर ठेवले आहे. त्यासाठी प्रत्येक भारतीयाने आपले कुटुंबीय, नातेवाईक व परिचित अशा किमान १० सदस्यांपर्यंत मावळा गीत पोहचवावे, असे आवाहन इंडिया आशा फाउंडेशनतर्फे करण्यात आले.

सीमेवर लढणारे जवान तर महान आहेतच परंतु आरोग्य, शेती, क्रिडा, कला, साहित्य, संशोधन, उद्योग अशा इतरही क्षेत्रात निष्ठेने काम करून अनेक लोकांनी भारताचे नाव जगात उज्ज्वल केले आहे. प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटावा, देशसेवेसाठी प्रेरणा मिळावी व देशाची प्रतिमा जगभरात सकारात्मकरित्या उंचावण्याचे काम

Education. CivicDuties. HealthCare

'मी एक निनावी मावळा' या गीतातून होणार आहे. इंडिया आशा फाउंडेशनचे संस्थापक संजीव दहिवदकर यांच्या या गीताला गायिका हिमांगी विश्वरूप यांनी स्वरसाज देऊन आपल्या मधुर आवाजात गायले आहे. संगीत संयोजन समाधान वर्तक यांनी केले आहे तसेच निता दुसाने यांनी या प्रकल्पात सहाय्य केले आहे. मी एक निनावी मावळा हे देशभक्तीपर गीत १३ ऑगस्टपासून www.indiaasha.org या संकेतस्थळावरील https://youtu.be/pTWZmMFYGyY या युट्युब लिंकवर उपलब्ध आहे. केवळ १५ ऑगस्ट व २६ जानेवारीच नव्हे तर रोजच देशसेवा व देशाभिमान प्रत्येक भारतीयाच्या नसानसात जागृत करण्यासाठी जास्तीतजास्त लोकांपर्यंत हे गीत पोहचविण्याचे आवाहन इंडिया आशा फाउंडेशनतर्फे केले आहे.

Powered by iDocuments